


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३२९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१० जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पुण्यात दरड कोसळली, ३ जण गेले, पण नंतर घात झाला

# रात्रीच्या अंधारात अमानवी कृत्य!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, लोणावळा :** मावळातील पाटण गावात सोमवारी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण गावासह मावळात हळहळ व्यक्त होत आहे. या दरडीच्या सावटाच्या भयाने सैरभैर झालेल्या गावाने गावातील आपली घरं सोडून जवळ मिळेल ठिकाणी व नातेवाईकांच्या येथे आसरा घेतला. यामुळे ओस पडलेले पाटण गाव या नैसर्गिक आपत्तीच्या संकटात असताना गावावर मानवनिर्मित संकटाने घाला घातला आहे. दरडीच्या भीतीमुळे घरं सोडल्याचा गैरफायदा घेऊन चोरट्यांनी पाटण गावातील सुमारे १९ घरांची घरफोडी केल्याचा दुर्दैवी प्रकार गुरुवारी मध्यरात्री घडला आहे. या प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाची तीव्र लाट पसरली आहे. या घटनेला पोलिस प्रशासनासह इतर प्रशासनाला जबाबदार धरत तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे.

सोमवारी ६ जुलैच्या पहाटे मावळ तालुक्यातील मळवलीच्या जवळील पाटण गावात मोठी दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत एकाच घरातील तिघांचा मृत्यू झाला असून, दरडीमुळे परिसरातील अनेक घरांसह गाड्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच गावाला पाणीपुरवठा करणारी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन वाहून गेल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

अतिवृष्टीमुळे सुरक्षिततेचा उपाय म्हणून संपूर्ण गाव खाली करण्यात आले होते. मात्र, याच नैसर्गिक आपत्तीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी गुरुवारी मध्यरात्री व पहाटे गावात अक्षरशः हैदोस घालत एकाच रात्री १९ बंद घरांची कुलूप आणि कड्या तोडून संसारोपयोगी साहित्यांसह लाखो रुपयांचे दागदागिने व रोख रक्कम लंपास केल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. अद्याप दरडीचे भयावह संकट डोळ्यासमोर व डोक्यावर असताना घरफोड्यांच्या संकटामुळे पाटण ग्रामस्थांमध्ये संतापाची तीव्र लाट पसरली असून, प्रशासनाविरोधात प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



विसापूर किल्ल्याच्या पायथ्याशी डोंगराच्या पायथ्याशी वनराईत कुशीत मावळ तालुक्यातील मळवली जवळील पाटण वसलेले आहे. सोमवारी ६ जुलैला पहाटे डोंगराच्या कुशीत वसलेल्या पाटण गावात दरड कोसळून एकाच घरातील तिघांचा मृत्यू दुर्दैवी मृत्यू झाला. यामध्ये आई वडील आणि मुलगा यांचा समावेश आहे. या घटनेनंतर पाटण गावाला दरडीचा मोठा धोका निर्माण झाल्याचे वास्तव चित्र समोर आल्याने प्रशासनाने तातडीने सुरक्षेच्या कारणास्तव ग्रामस्थांना गाव खाली करण्याचे आदेश दिले.

जीवाच्या भीतीने व प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थांनी आपली घरे दारे बंद करून आप आपल्या नातेवाईकांकडे तसेच त्यांच्या इतर सुरक्षित स्थळी स्थलांतर करत आसरा घेतला. यामुळे संपूर्ण गाव ओस पडल्याचा गैरफायदा चोरट्यांनी घेतला. गुरुवारी मध्यरात्री व पहाटे अंधाराचा फायदा उठवत चोरट्यांनी गावात प्रवेश करून एकामागून एक तब्बल १९ घरांच्या दरवाज्याच्या कड्या, कोयंडे, कुलूप व खिडक्यांच्या काचा तोडून घरात प्रवेश करत घरफोड्यांचा सपाटा लाऊन काही संसारोपयोगी साहित्यांसह घरातील सोन्या-चांदीचे दागिने, पैसे आणि इतर मौल्यवान वस्तू चोरून चोरटे पसार झाले आहेत.

**आम्ही गाव खाली केले, मग प्रशासनाने सुरक्षा का केली नाही? ग्रामस्थांचा संतप्त सवाल**

या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी गावात धाव घेतली. आपल्या घरांची झालेली दुरवस्था आणि चोरीला गेलेला ऐवज पाहून ग्रामस्थांचा संयम सुटला. दरडी संकटाच्या भीतीने प्रशासनाच्या सूचनेचा मान राखून आम्ही आमची घरे दारे सोडून बाहेर गेलो. मग आमच्या मागे गावाची आणि आमच्या मालमत्तेची सुरक्षा करण्याची जबाबदारी प्रशासनाची नव्हती का? गावात किमान दोन पोलीस कर्मचारी जरी गस्तीला ठेवले असते, तर आज आमच्यावर ही वेळ आली नसती. एका बाजूला हक्काचे घर सोडून जाण्याचे दुःख आणि दुसरीकडे साठवलेली पुंजी चोरीला गेल्याचा मानसिक धक्का, आम्ही आता जगायचे कसे? असा प्रश्न संतप्त ग्रामस्थानी उपस्थित केला आहे.


**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या!**

दरडीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी. दरडीच्या नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल व सैरभैर झालेल्या ग्रामस्थांना या चोऱ्यांमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी. तसेच पोलिसांनी चोरट्यांचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी. चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळवून द्यावा. तसेच नैसर्गिक आपत्तीचा फायदा घेणाऱ्या या चोरट्यांना कडक शासन करावे. येथील परिस्थिती पूर्वपदावर येत नाही, तोपर्यंत रिकाम्या असलेल्या पाटण गावात २४ तास पोलीस गस्त तैनात करण्यात यावा. या मागण्यासह पुनर्वसन, रस्ते, पाणी, वीज या पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करण्यात यावी. अशा मागण्या ग्रामस्थांनी सरकार आणि संबंधित प्रशासनाकडे केल्या आहेत.

# शाळा की छळछावणी?

## गंगापूरच्या 'न्यू हायस्कूल'मध्ये शिक्षकाचा थरार

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०९, गंगापूर (छ.संभाजीनगर) :** गंगापूर शहरातून आज एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. येथील 'न्यू हायस्कूल'मध्ये केवळ वर्गात बडबड केल्याच्या किरकोळ कारणावरून इयत्ता नववीच्या दोन निष्पाप विद्यार्थ्यांना शिक्षकाने हात फुटेपर्यंत आणि रक्तबंबाळ होईपर्यंत अमानुषपणे मारल्याचा खळबळजनक प्रकार आज, गुरुवार दिनांक ९ जुलै २०२६ रोजी घडला. या घटनेमुळे संपूर्ण शहरात पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून शिक्षण क्षेत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**नेमका काय आहे प्रकार?**

मिळालेल्या माहितीनुसार, आज शाळेत तास सुरू असताना वर्गात बोलल्याच्या कारणावरून संबंधित शिक्षकाचा पारा चढला. शिक्षकाने कसलाही विचार न करता इयत्ता नववीत शिकणारे विद्यार्थी भार्गव जोशी आणि समर्थ सोनवणे यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाणीचा वेग आणि क्रूरता इतकी भयानक होती की, दोन्ही विद्यार्थ्यांचे हात सुजले, त्यांना गंभीर जखमा झाल्या आणि हातांमधून थेट रक्तस्राव सुरू झाला.

**विद्यार्थ्याला मानसिक धक्का;**
**हात थरथरू लागल्याने रुग्णालयात दाखल**

या अमानुष मारहाणीचा भार्गव आणि समर्थ या दोन्ही विद्यार्थ्यांना मोठा मानसिक व शारीरिक धक्का बसला आहे. यापैकी समर्थ सोनवणे या विद्यार्थ्याची प्रकृती मारहाण झाल्यापासून अत्यंत खालावली आहे. त्याला सतत चक्कर येणे, शरीर आणि हात प्रचंड थरथरणे असा गंभीर शारीरिक त्रास सुरू झाला. घाबरलेल्या पालकांनी त्याला तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले. शिक्षकाच्या या हैवानियतमुळे विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

**पालकाची पोलिस ठाण्यात धाव**

पालकांनी आणि संतप्त नागरिकांनी या मुजोर शिक्षकावर तात्काळ निलंबनाची आणि फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन :** कायद्यानुसार शाळेत कोणत्याही विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक त्रास देणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरतो. असे असतानाही विद्यार्थ्यांचे हात रक्तबंबाळ करेपर्यंत मारणाऱ्या शिक्षकावर शिक्षण विभाग काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, या खळबळजनक घटनेनंतर न्यू हायस्कूल प्रशासन आणि संबंधित शिक्षकाची बाजू अद्याप समोर आलेली नाही. मात्र, या घटनेने गंगापूरमधील शैक्षणिक वर्तुळ हादरले असून दोषी शिक्षकाला पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

> केवळ वर्गात बोलले म्हणून मुलांना रक्त निघेपर्यंत मारणे ही क्रूरता आहे. अशा शिक्षकांमुळे संस्था बदनाम होतात.शिक्षण विभागाने तातडीने दखल घेऊन या शिक्षकावर कडक कारवाई करावी,
> **– संतापलेले पालक व नागरिक, गंगापूर.**

# रेकॉर्डब्रेक पावसातही कळंबोली सुरक्षित !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, पनवेल :** पनवेल परिसरात गेल्या सहा दिवसांत तब्बल एक हजार मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद होत असताना, सर्वाधिक पूरप्रवण मानल्या जाणाऱ्या कळंबोली परिसरात यंदा कुठेही मोठ्या प्रमाणावर पाणी साचले नाही. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी राबविलेल्या व्यापक नियोजन, नवीन जलनिस्सारण व्यवस्था, सखोल नालेसफाई आणि होल्डिंग पॉईंटवरील नवीन गेट्सच्या उभारणीमुळे विक्रमी पावसाचाही प्रभावी सामना करण्यात महापालिकेला यश आले आहे.

यावेळी मे महिन्यापासून महापौर नितीन पाटील यांनी सातत्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका घेऊन कामाचा आढावा घेतला होता. तसेच आवश्यक सूचना संबधित विभागास दिल्या होत्या. जून महिन्याच्या अखेरपर्यंत पावसाने फारशी हजेरी लावली नव्हती. मात्र, २८ जूनपासून पावसाला सुरुवात झाली आणि ३० जूननंतर त्याने जोरदार रूप धारण केले. जुलैच्या पहिल्याच आठवड्यात मुसळधार पाऊस पडला. गेल्या सहा दिवसांत पनवेल परिसरात एक हजार मिलिमीटरपेक्षा




अधिक पावसाची नोंद झाली असून, कळंबोलीतही विक्रमी पर्जन्यमानाची नोंद झाली.

गेल्यावर्षी १५ मे रोजी अवघ्या काही तासांत झालेल्या सुमारे २५० मिलिमीटर पावसामुळे कळंबोलीतील अनेक भाग जलमय झाले होते. या अनुभवामुळे महापालिकेने यंदाच्या पावसाळ्यापूर्वीच आवश्यक उपाययोजनांना प्राधान्य दिले. खाडी परिसरातील होल्डिंग पॉईंटवर नवीन गेट्स बसविणे, प्रमुख नाले व गटारींची सखोल साफसफाई तसेच जलनिस्सारण व्यवस्थेची व्यापक दुरुस्ती अशी विविध विकासकामे वेळेत पूर्ण करण्यात आली. तसेच यावर्षी महापालिकेने कळंबोलीमध्ये पंचवटी सोसायटी सेक्टर १ मध्ये पल्लवी अविदा, तसेच अग्निशमन केंद्र ते करवली चौक, केएलई महाविद्यालय ते विसर्जन तलाव सेक्टर १२ याठिकाणी, सेक्टर १० मध्ये विजय मिलन सोसायटी जवळ, सेक्टर ११ मध्ये गुरूद्वाराजवळ मोठ्या क्षमतेचे नवीन पावसाळी गटार बांधण्यात आले. या पावसाळी गटारींमुळे कळंबोलीमध्ये पाणी साठले नाही.

याशिवाय मुसळधार पावसाच्या काळात आरोग्य विभागाची विशेष पथके कळंबोली परिसरात तैनात ठेवण्यात आली होती. आपत्कालीन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवत आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख कैलास गावडे यांच्या नेतृत्वात महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने काम केल्यामुळे नागरिकांना कोणत्याही मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला नाही. विशेष म्हणजे ४ जुलै रोजी कळंबोलीत तब्बल २१७.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. तरीही परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्याच्या घटना घडल्या नाहीत. अतिरीक्त आयुक्त १ गणेश शेटे व अतिरीक्त आयुक्त २ महेशकुमार मेघमाळे व सर्व विभागाचे उपायुक्त यांनी वेळोवेळी केलेल्या पूर्वतयारीचे आणि सक्षम नियोजनाचे हे यश मानले जात असून, कळंबोलीतील नागरिकांनीही या कामांबद्दल समाधान व्यक्त करत महापालिकेच्या कार्याचे कौतुक केले.

## आझाद मैदानावर शिक्षकांचा एल्गार; राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन उत्स्फूर्त प्रतिसादात

**अक्षराज: भानुदास गायकवाड**

**दि.०९, मुंबई :** शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (दि.०९) मुंबईतील आझाद मैदानावर राज्यभरातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन केले. आंदोलनाला राज्यातील विविध शिक्षक संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या आंदोलनाला विविध शिक्षक संघटनांनी पाठिंबा दिला. टीईटीच्या जाचक अटीतून मुक्तता, बीएलओच्या अशैक्षणिक कामातून शिक्षकांची मुक्तता, पदोन्नतीतील अन्याय दूर करणे, संचमान्यता धोरणात सुधारणा तसेच




सेवाविषयक प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढावेत, अशा प्रमुख मागण्या आंदोलनाद्वारे शासनाकडे करण्यात आल्या. आझाद मैदानावर झालेल्या सभेत विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी शिक्षकांच्या समस्या सोडविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शासनाने मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न घेतल्यास भविष्यात राज्यव्यापी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलन शांततेत पार पडले.

## बोरी पोलिसांची धडक कारवाई
## चोरीच्या ८ दुचाकी जप्त, २ आरोपी गजाआड

**अक्षराज : जफर शेख**




**दि.०९, जिंतूर :** तालुक्यातील बोरी पोलिसांनी एका धडक कारवाईत मोटारसायकल चोरीचे तब्बल ८ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत पोलिसांनी २ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून ३ लाख ९५ हजार रुपये किमतीच्या ८ दुचाकी जप्त केल्या आहेत. बोरी पोलिसांच्या या उत्कृष्ट कामगिरीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कौतुक होत आहे. पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या सूचनेनुसार मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना, बोरी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी आडगाव फाटा येथे सापळा रचून जनार्दन कोकाटे (वय २५) आणि बाळासाहेब रामकिशन शिंदे (वय २३, दोन्ही रा. खानापूर फाटा, परभणी) यांना संशयास्पद रित्या चोरीच्या मोटारसायकलसह ताब्यात घेतले.दोन्ही आरोपींकडे पोलिसी खाक्या दाखवत कसून चौकशी केली असता, त्यांनी यापूर्वी परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील विविध भागांतून आणखी चार मोटारसायकली चोरल्याची व त्या कमी किमतीत विकल्याची कबुली दिली. पोलिसांनी अधिक तपास करत आरोपींच्या ताब्यातून एकूण ८ मोटारसायकली जप्त केल्या, ज्यांची अंदाजे किंमत ३ लाख ९५ हजार रुपये आहे. तपासादरम्यान आरोपींनी नवा मोंढा (परभणी), नानलपेठ (परभणी) तसेच नांदेड जिल्ह्यातील वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून या गाड्या चोरल्याचे निष्पन्न झाले आहे. या गाड्या त्यांनी बोरी जवळील पिंपळगाव गायकवाड व बोरी गावातील काही लोकांना विकल्या होत्या.

"कागदपत्रांची पडताळणी करून या गाड्या मूळ मालकांच्या स्वाधीन केल्या जातील, अशी माहिती बोरी पोलीस ठाण्याचे सपोनि रमेश्वर धोंडगे यांनी दिली. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली बोरी पोलीस ठाण्याचे सपोनि. रमेश्वर धोंडगे, राजेश जटाळ, प्रताप साळुंखे, अमोल मुंढे, संघसेन कांबळे आणि प्रकाश मोरे यांनी केली आहे




## महिला 'शेतकरी' झाल्या, पण...

महाराष्ट्र विधानसभेने नुकतेच, २ जुलै २०२६ रोजी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' एकमताने मंजूर केले. शेतजमीन स्वतःच्या नावावर नसली आणि सातबारा उताऱ्यावर नाव नसले, तरी शेती आणि तिच्याशी निगडित उपजीविकांमध्ये प्रत्यक्ष श्रम करणाऱ्या महिलांना स्वतंत्र 'महिला शेतकरी' म्हणून ओळख देण्याचा हा राज्यातील पहिलाच व्यापक कायदेशीर प्रयत्न आहे. शेतीत श्रम करणाऱ्या महिलांना या कायद्यामुळे 'शेतकरी' म्हणून अधिकृत मान्यता मिळेल, कृषी योजनांचा लाभ घेता येईल. कर्ज, अनुदान, पीक विमा, बियाणे, खते आणि इतर शासकीय सुविधांपर्यंत त्यांची पोहोच यामुळे वाढेल असे अपेक्षित आहे. हा निर्णय प्रशासकीयदृष्ट्या तर महत्त्वाचा आहेच; पण सोबत प्रतीकात्मक अर्थानेदेखील तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

भारतीय शेतीच्या इतिहासात महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने, किंबहुना अनेकदा त्यांच्यापेक्षाही अधिक श्रम उपसले आहेत. तरीही समाजाने त्यांच्याकडे 'शेतकरी' म्हणून नव्हे, तर 'शेतकऱ्याची बायको', 'शेतमजूर' किंवा 'मदतनीस' म्हणून कायम अवलंबित्व असलेली व्यक्ती याच दृष्टीने पाहिले आहे. धोरणांच्या भाषेत एखाद्या अदृश्य गटाला अधिकृत ओळख मिळणे, ही एक महत्त्वाची घटना असते. आणि म्हणून या विधेयकाद्वारे महाराष्ट्राने देशात एक सकारात्मक संदेश दिला आहे, असे म नता येईल, पण एखाद्या विधेयकाचे, धोरणाचे किंवा त्यावर आधारित कार्यक्रमाचे मूल्यमापन केवळ त्याच्या उद्देशावर नव्हे, तर त्याच्या परिणामांवर करावे लागते. कालांतराने या विधेयकाचे सखोल स्वरूप स्पष्ट होईलच आणि त्याचे असे मूल्यम ापनदेखील होईल; परंतु विधिमंडळातील चर्चेमधून या विधेयकाचे जे स्वरूप समोर येते आहे, त्यावर सध्या तरी काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात.

या विधेयकामागील भूमिका स्पष्ट करताना राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले, की या कायद्याचा उद्देश महिलांच्या नावावर शेतीची मालकी हस्तांतरित करणे नसून त्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख मिळवून देणे, हा आहे. मात्र, या स्पष्टीकरणातून विधेयकाची सर्वांत मोठी मर्यादा आपल्या लक्षात येते. आजही महाराष्ट्रात महिलांच्या नावावर असलेल्या सातबारा उताऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे विविध अभ्यास आणि संशोधनाच्या निष्कर्षांतून दिसून येते. त्यामुळे मुळातच महिलांच्या जमीन मालकीबाबतची राज्यातील ही खोल विषमता आपण लक्षात घेतली पाहिजे.

राज्याला जर खऱ्या अर्थाने महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करायचे असते, तर महिलांच्या जमिनीवरील मालकी हक्कात लक्षणीय वाढ घडवून आणणे हे सर्वांत प्रभावी पाऊल ठरले असते. परंतु या विधेयकात महिलांना 'शेतकरी' म्हणून मान्यता मिळते; मालकी मात्र मिळत नाही. ज्या स्त्रियांच्या नावे सातबारा नाही, अशा स्त्रियांनाही आता शेतकरी म्हणून दर्जा 'दिला' जाणार हे वरकरणी क्रांतिकारी वाटत असले, तरी हा त्यांचा केवळ 'अनौपचारिक' सन्मान आहे. अनौपचारिक सन्मानात शोषणाची मुळे दडलेली असतात. हे विधेयकदेखील स्त्रियांना असेच तोंडदेखले 'शेतकरी' दर्जा देणारे दिसते आहे. केवळ प्रतीकात्मक मान्यता आणि प्रत्यक्ष संरचनात्मक बदल यांत मूलभूत फरक असतो. अनौपचारिक किंवा प्रतीकात्मक मान्यता भावनिक समाधान देऊ शकते; परंतु ती अनेकदा विषमतेची मूळ कारणे दूर करण्याऐवजी त्यांवर पडदा टाकण्याचे काम करते. या विधेयकाबाबतही अशी शंका घेण्यास निश्चितच वाव आहे.

महिलांना शेतकरी म्हणून मान्यता मिळाल्यामुळे त्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांसाठी पात्र ठरतील, असे सरकारचे म्हणणे आहे. मात्र योजनांचा लाभ मिळणे आणि त्या लाभांवर प्रत्यक्ष नियंत्रण असणे या दोन संपूर्ण वेगळ्या गोष्टी आहेत. जोपर्यंत शेती-व्यवहारात महिलांचे मालकी हक्क आणि निर्णयक्षमता बळकट होत नाही तोपर्यंत अनेक कुटुंबांमध्ये या योजनांमधून निर्माण होणाऱ्या संसाधनांवर आणि आर्थिक लाभांवर अंतिम नियंत्रण पुरुषांच्याच हातात राहण्याची शक्यता आहे, हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

**- आनंद पवार**

# भ्रष्टाचाऱ्यांना आपल्याकडे कडक शासन केव्हा होणार ?

चीनमधील नानजिंग आर्थिक विकास क्षेत्राचे माजी वरिष्ठ अधिकारी यांग योलिन यांना ३० वर्षांत तब्बल ३ सहस्र कोटी रुपयांची लाच स्वीकारल्याच्या प्रकरणी न्यायालयाने नुकतीच फाशीची शिक्षा सुनावली. न्यायालयाने यांग योलिन यांना केवळ लाचखोरीच नव्हे, तर सार्वजनिक निधीचा अपहार, सत्तेचा गैरवापर, आर्थिक गैरव्यवहार आणि इतर आर्थिक गुन्ह्यांमध्येही दोषी ठरवले आहे. तसेच त्यांच्या सर्व वैयक्तिक मालमत्ता जप्त करण्याचे आणि अवैधरित्या मिळवलेली संपूर्ण रक्कम वसूल करण्याचे आदेशही दिले. चीनमधील नारिकांनी न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. भ्रष्टाचार ही केवळ भारतालाच नव्हे तर जगाला लागलेली कीड आहे; मात्र अन्य देशांत ज्या प्रकारे भ्रष्टाचाऱ्यांना शासन केले जाते तसे भारतात का केले जाते हाच प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली; मात्र भ्रष्टाचाराचे उच्चाटन करण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न केलेले नाहीत. शिपायापासून बड्या अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे पसरलेली असतात त्यामुळे कारवाई तरी कोणावर करायची हा प्रश्नच असतो. भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी सरकारचा स्वतंत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. या विभागाकडून प्रतिवर्षी भ्रष्टचाराची शेकडो प्रकरणे उघडकीस आणली जातात; मात्र त्यांपैकी किती प्रकरणात कारवाई होते? अनेक प्रकरणे वर्षो नुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या (उतउ) अहवालानुसार, सीबीआयद्वारे तपासण्यात आलेली ७,०७२ हून अधिक भ्रष्टाचाराची प्रकरणे आज विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. यातील तब्बल २,६६० प्रकरणे १० वर्षांहून अधिक काळ, तर ३७९ प्रकरणे २० वर्षांहून अधिक काळापासून खटल्यात अडकलेली आहेत. याव्यतिरिक्त, सीबीआय व आरोपींनी दाखल केलेल्या सुमारे १३,१०० अपील व पुनर्विलोकन याचिका विविध उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो (छउठइ) च्या अहवालानुसार, भ्रष्टाचाराच्या कारवायांमध्ये महाराष्ट्र सलग काही वर्षांपासून देशात प्रथम क्रमांकावर आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (अउइ) च्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्षभरात ९०६ लाचखोर पकडले गेले; परंतु वर्षाखेरपर्यंत केवळ १९% प्रकरणांमध्येच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होऊ शकले आहे. राज्यात दाखल झालेल्या भ्रष्टाचाराच्या एकूण प्रकरणांपैकी तब्बल ९४% प्रकरणे विविध न्यायालयांत प्रलंबित आहेत. महसूल आणि पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे सर्वाधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत.

विकासासाठी आणि जनतेच्या सोयीसुविधांसाठी शासनाकडून विविध योजना आखल्या जातात. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला जातो; मात्र राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे या शासकीय योजना आणि निधी तळागाळापर्यंत येईपर्यंत त्यातील बराचसा मलिदा राजकीय मंडळींकडून लाटला जातो. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी देशातील भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते 'सामान्य लोकांच्या योजनांसाठी दिल्लीतून निघालेल्या १०० रुपयांपैकी सामान्य लोकांपर्यंत केवळ १० रुपयेच पोहोचतात.' शासकीय कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घ्यायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो.

अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी म ालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा म ोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? आजतागायत कित्येक मंत्र्यांवर, राजकीय नेत्यांवर कोट्यवधी रुपयांच्या योजनांतील भ्रष्टाचाराचे आरोप झाले; मात्र त्यापैकी केवळ हाताच्या बोटावर म ोजता येईल एवढ्याच मंडळींना शिक्षा झाली. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (अ्ठ) आणि विविध न्यायालयीन अहवालांनुसार, राजकीय नेत्यांशी संबंधित भ्रष्टाचाराच्या खटल्यांमध्ये आरोपी दोषी ठरण्याचे प्रमाण केवळ ६% ते १२% च्या दरम्यान आहे. तब्बल ८५% ते ९०% प्रकरणांमध्ये राजकीय नेते पुराव्याअभावी निर्दोष सुटतात किंवा तांत्रिक त्रुटींमुळे (उदा. राज्य सरकारकडून खटला चालवण्याची मंजुरी न मिळणे) त्यांच्यावरील खटले रद्द होतात. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता लोकप्रतिनिधींसाठी (खासदार/आमदार) विशेष न्यायालये (त्रीिं ढॲरलज्ञ ऊेंऑी) स्थापन करण्यात आली आहेत. तरीही, अद्याप देशात लोकप्रतिनिधींवर भ्रष्टाचाराचे आणि इतर गुन्हेगारी स्वरूपाचे ५,००० हून अधिक खटले प्रलंबित आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होणे आणि आरोप सिद्ध होऊन आरोपीला शिक्षा होण्याचे प्रमाणसुद्धा राजकीय नेत्यांप्रमाणेच नगण्य आहे. अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते. चीनमधील माजी वरिष्ठ अधिकारी यांग योलिन यांना ज्याप्रमाणे भ्रष्टाचाराच्या प्रकरणी फाशीची शिक्षा झाली त्याप्रमाणे भारततही अशा स्वरूपाची शिक्षा भ्रष्ट आणि मुजोर प्रशासकीय अधिकाऱ्यांना, राजकीय नेत्यांना जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार असाच चालत राहणार का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# लिट्ल मास्टरला वाढदिवसाच्या शुभेच्छा !

क्रिकेट हा आज सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. भारत हा आज क्रिकेटमधील दादा संघ आहे. मात्र सत्तरच्या दशकापर्यंत भारत हा क्रिकेटमधील लिंबूटिंबू संघ समजला जात होता. त्या काळी फक्त कसोटी क्रिकेट खेळले जायचे. भारताने कसोटी अनिर्णित राखली तरी ती मोठी बातमी असायची. भारताने कसोटीत विजय मिळवला ही बातमी तर दुर्मिळ असायची.




भारताला जो विजय मिळायचा तो अर्थात भारतातच मिळायचा. भारताबाहेर परदेशात विजय मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज हे त्या काळातील दादा संघ. त्यांना त्यांच्या देशात जाऊन हरवायचे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. अशीच अशक्यप्राय गोष्ट भारताने शक्य केली ती १९७१ साली. १९७१ साली भारताचा संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला होता.

त्या संघात एक छोट्या चणीचा मराठी मुलगा भारतीय संघात प्रथमच खेळत होता. त्याची ती पहिलीच कसोटी मालिका. समोर वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांचा तोफखाना. हा छोट्या चणीचा मुलगा सलामीला खेळायला गेला. नुसताच खेळायला गेला नाही तर तो खेळला, असा खेळला की त्याने आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत विश्वविक्रम केला. आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत ते ही वेस्ट इंडिजच्या तोफखान्यासमोर त्याने विक्रमी ७७४ धावा काढल्या. त्याचा हा विश्वविक्रम अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही हे विशेष. त्याच्या या विक्रमी फलंदाजीने भारताने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये हरवले आणि या छोट्या चणीच्या मराठी म ुलाची दखल जगाने घेतली. आपल्या पहिल्याच मालिकेत विक्रमी धावा काढणारा हा मुलगा होता सुनील म नोहर गावस्कर.

हो तोच सुनील गावस्कर जो पुढे जाऊन भारतीय संघाचा आधारस्तंभ बनला. ज्याने अनेक विश्वविक्रमांना गवसणी घातली. ज्याने डॉन ब्रॅडमन यांच्या २९ शतकांच्या शतकी खेळीचा विक्रम मोडून ३४ शतके काढली. कसोटी क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा पार करणारा जो पहिला खेळाडू ठरला. ज्याने आपल्या देशाला अनेक अविस्मरणीय विजय मि ळवून दिले त्याच सुनील गावस्कर यांचा आज ७७ वा वाढदिवस.

१० जुलै १९४९ रोजी मुंबईत जन्मलेले सुनील गावस्कर हे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम आघाडीचे फलंदाज म्हणून ओळखले जातात. १९७१ ते १९८७ असे सतरा वर्ष त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले या दरम्यान त्यांनी १२५ कसोटी सामन्यात ५१.१२ च्या सरासरीने १०,१२२ धावा काढल्या. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, न्यूझीलंड अशा सर्वच संघाविरुद्ध त्यांनी खोऱ्याने धावा काढल्या. त्या काळातील गोलंदाज आजच्या सारखे नव्हते. आग ओकणारे गोलंदाज होते. वेस्ट इंडीजचे अँडी रॉबर्ट्स, जोएल गार्नर, माल्कम मार्शल, म ायकल होल्डींग, पॅट्रिक पॅटरसन, इंग्लंडचे बॉब विलिस, जॉन स्नो, इयान बॉथम, पाकिस्तानचे इम्रान खान, सरफराज खान, ऑस्ट्रेलियाचे जेफ थॉमसन, डेनिस लिली केवळ नाव घेतले तरी थरकाप उडतो. हे गोलंदाज नव्हते तर फलंदाजांचे कर्दनकाळ होते. त्यांच्या समोर धावा काढणे तर दूरच पण उभे राहणे देखील मुश्कील होते. अशा खुंखार गोलंदाजांसमोर सुनील गावस्कर खोऱ्याने धावा काढत असे ते त्यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या जोरावर. सुनील गावस्कर यांची गणना क्रिकेटच्या इतिहासात सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज अशी केली जाते. ते फलंदाजीस उतरत तेंव्हा पायाला पॅड आणि हातात ग्लोज एव्हढेच सुरक्षेचे साधने घालून. सुनील गावस्कर यांनी हेल्मेट कधीही वापरले नाही ते कायम डोक्यावर स्कल कॅप घालायचे. स्कल कॅप घालूनच त्यांनी त्या काळातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आणि खोऱ्याने धावा काढल्या. या दरम्यान त्यांना लिटल मास्टर पदवी मिळाली. आजही त्यांच्या नावापुढे लिटिल मास्टर असेच लिहिले जाते. या दरम्यान त्यांनी भारतीय संघाचे कर्णधारपदही सांभाळले.

१९८३ चा विश्वचषक जिंकून देण्यातही त्यांचा मोलाचं वाटा होता. ते केवळ उत्कृष्ट फलंदाजच नव्हते तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकी होते. त्यांनी कसोटीत १०० हून अधिक झेल टिपले. यष्टिरक्षक सोडून कसोटीत १०० हून अधिक झेल घेणारा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला. कसोटीतील त्यांच्या अद्वितीय काम गिरीमुळे १९८० मध्ये त्यांना विस्डेन या क्रिकेटम धील प्रसिद्ध मासिका तर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन् रुईंस व वन डे वंडर ही तीन पुस्तके लिहिली. आज ते समालोचन आणि स्तंभलेखन करतात. आज त्यांचा ७७ वा वाढदिवस. सुनील गावस्कर यांना ७७ व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

Happy birthday little master

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### ते तडे

पहिल्यांच पावसांत
पुलाला पडलेले तडे
गरमागरम हा विषय
ब्रेकिंग न्यूज तडतडे

कॅमेरे फिरे भिर भिरे
उडू लागलेत तुडतुडे
असूद्यालहानशी रेष
दाखवा बडे भगदाडे

अफवाएक्स्प्रेसवेवर
धावी जिकडे तिकडे
कोणपाहे तपासून रे
फुगवून सांग आकडे

ए आय आहेचंसाथी
खड्डे पडले हे केवढे
विरोधी आक्रोश सुरु
लक्ष नाही कसे एवढे

जीव मुठीत अस्वस्थ
प्रवास करणारे गधडे
तशाचं रेटतातगाड्या
कधीचं ना घेणार धडे

उद्घाटन झाले घाईत
आता न दावी मुखडे
समोर येईना ते कुणी
कोण ऐकणारं दुखडे

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नवीन बिना बौद्ध विहारात निशुल्क नेत्र तपासणी शिबिर



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ, राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि प्रशिक ऑप्टिकल नागपूर यांच्या सौजन्याने नवीन बिना बौद्ध विहारात डॉ.मिनाक्षी डोंगरे यांच्या निदर्शनात निशुल्क नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना अध्यक्ष प्रा.डॉ.जितेंद्र सावजी तागडे यांनी मानवाच्या कल्याणाचा मार्ग बौद्ध धर्मात असून अशा निशुल्क शिबिरातून मानवी सेवेचे व्रत पूर्ण होतात व यासाठी भा.बौ. महासभा कटिबद्ध आहे असे सांगितले. निशुल्क नेत्र तपासणी शिबिरात महिला वर्ग व जेष्ठ नागरिकांनी हिरीहीरीने सहभागी होवून जवळपास शंभर लोकांनी याचा लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, सल्लागार समितीचे मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, आशोक कांबळे, मिलिंद गौरकर, आनंद वसनिक, पृथ्वीराज गोलाईत, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता गजभिये, निर्मला चिमनकर, अंजना मेश्राम, प्रभा लोखंडे, वच्छला गणविर, बेबी वासनिक, राधा गौरकर, मिना मेश्राम, सत्यभामा वसनिक, सत्यफुला कांबळे, कांता गोलाईत, नंदा सोमकुंवर, मिना नरेश ढोके, वंदना गणविर, प्रीती गोलाईत, रोहिणी धनवटे, कल्पना वासनिक, विशाखा ढोके आणि सारिका तागडे यांनी परिश्रम घेतले.

## आषाढी यात्रेपूर्वी अनधिकृत रिक्षांवर धडक कारवाई

### ६१ रिक्षांवर दंडात्मक कारवाई, ₹४.१० लाखांचा दंड



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०९, पंढरपूर :** आषाढी एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात पोलीस व परिवहन विभागाने संयुक्त तपासणी मोहीम राबवत अनधिकृत व नियमबाह्य पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांवर धडक कारवाई केली. या मोहिमेत ११५ रिक्षांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६१ रिक्षांवर कारवाई करण्यात आली. तसेच ११ रिक्षा जप्त करण्यात आल्या असून एकूण ४ लाख १० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

यंदा आषाढी शुद्ध एकादशी २५ जुलै २०२५ रोजी असून यात्रा कालावधी १५ ते २९ जुलै असा आहे. या काळात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख भाविक पंढरपूरात येण्याची अपेक्षा आहे. भाविकांची वाहतूक सुरक्षित, सुलभ आणि सुव्यवस्थित राहावी, तसेच क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक व निश्चित दरांपेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या रिक्षाचालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती मोटार वाहन निरीक्षक संतोष झगडे यांनी दिली. वैध चालक परवाना, परमिट, फिटनेस प्रमाणपत्र व विमा नसताना प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच सर्व रिक्षाचालकांनी आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगावीत आणि शासनाने निश्चित केलेले भाडेपत्रक प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. ही संयुक्त कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन अधिकारी स्वप्निल गिरी, मोटार वाहन निरीक्षक राजन सरदेसाई, श्रेयस सरागे, नितीन गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विक्रांत होनमोरे, प्रतीक्षा नारायणकर, भाग्यश्री रोडगे, कोमल डांगे, हनुमंत गेळे, सागर नलावडे तसेच पंढरपूर शहर पोलीस कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## शिवसेना (उबाठा गट) शाखा क्र २०४ च्या वतीने जेष्ठ नागरिकांना छत्री वाटप





**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०९, मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा क्रमांक २०४ चे उपशाखाप्रमुख राजन मनोहर कोतावडेकर यांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी छत्री वाटप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या वचनाला अनुसरून हा कार्यक्रम विभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केला होता. त्याप्रसंगी शिवसेना (उबाठा गटाचे) सचिव सुधीर साळवी, प्रभाग क्रमांक २०४ चे नगरसेवक किरण तावडे तसेच समाजसेवक राजेंद्र लांजवळ यांच्या शुभ हस्ते छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचे चिटणीस बाळासाहेब कांबळे तसेच ज्येष्ठ शिवसैनिक रमेश पाटील, सतीश खणकर, किरण वाणी, राजन राणे, राजेंद्र महाडीक, अशोक दातखिले, उपशाखाप्रमुख विलास कांबळे, विनय शेट्ये, धर्मेंद्र दुबे,आणि शिवसैनिक प्रशांत केळसकर, संदीप तुळसकर, प्रशांत जानवलकर, विक्रांत जाधव , शुभम जाधव, सुदर्शन केरकर, शुभम दुबे, विजय महाड़ीक, प्रशांत कसाबे व महिला आघाडी प्रमुख समृद्धी सोनावणे, इंद्रायणी तेली इत्यादीची उपस्थित होती.

## जेसीबी आला; काही नाले खुले करून गेला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, उंब्रज (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता.कराड येथून जाणाऱ्या पाटण-पंढरपूर राज्य मार्गालगतचे नाले वेळेत खुले न केल्यामुळे झालेल्या जोरदार पावसानंतर रस्त्यावरील पाणी शेजारील शेतांमध्ये शिरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. तसेच काही घरांभोवती पाणी साचल्याने नागरिकांनाही अडचणींचा सामना करावा लागल्याचे सांगण्यात आले.या पार्श्वभूमीवर संबंधित ठेकेदाराचा जेसीबी नाले खुले करण्यासाठी घटनास्थळी आला. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अविनाश थोरात व जगन्नाथ थोरात यांच्या शेतालगतचा नाला साफ करून पाण्याचा निचरा करण्यात आला. मात्र त्यानंतर प्रदीप थोरात, मच्छिंद्र थोरात व दत्तात्रय थोरात यांच्या हद्दीतील नाले साफ न करताच जेसीबी तेथून निघून गेल्याची चर्चा परिसरात सुरू होती. दत्तात्रय थोरात यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या घरासमोरील गेटपर्यंत पाणी साचल्याने अंगण जलमय झाले असून कुटुंबीयांना घराबाहेर पडणे ही कठीण झाले. विशेषतः रात्रीच्या वेळी पाण्याचा अंदाज न आल्यास अपघात किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, पावसाळ्यात अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी संबंधित विभागाने उर्वरित नाले तातडीने खुले करून पाण्याचा निचरा करण्याची मागणी दत्तात्रय थोरात यांनी केली आहे.

# आ.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे चंद्रपूरला शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयाची मंजुरी

### वैद्यकीय शिक्षण मंत्र्याकडे सातत्याने केला होता पाठपुरावा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** चंद्रपूर येथे शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू व्हावे, यासाठी राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. २९ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी सविस्तर निवेदन सादर करून कर्मवीर मा. सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर येथे १०० विद्यार्थ्यांच्या वार्षिक प्रवेश क्षमतेचे शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्याची आग्रही मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून शासनाने चंद्रपूर येथे शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालय स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे चंद्रपूरच्या आरोग्य व शिक्षण क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे. शासनाच्या निर्णयानुसार चंद्रपूर येथील कर्मवीर मा.सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयाची स्थापना करण्यात येणार असून, या महाविद्यालयाला १०० विद्यार्थ्यांची वार्षिक प्रवेश क्षमता असणार आहे. त्यामुळे चंद्रपूर व परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण नर्सिंग शिक्षणासाठी बाहेर जावे लागणार नाही. तसेच जिल्ह्यात प्रशिक्षित परिचारिकांची उपलब्धता वाढून आरोग्य सेवेलाही मोठी बळकटी मिळणार आहे. या निर्णयामुळे चंद्रपूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयामुळे आरोग्य शिक्षणाची पायाभूत सुविधा अधिक सक्षम होणार असून, प्रशिक्षित परिचारिका तयार करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक व्यवस्था बळकट होईल. परिणामी, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेलाही मोठी ताकद मिळणार आहे.आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळे चंद्रपूरच्या आरोग्य व शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळणार असून, स्थानिक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण नर्सिंग शिक्षणाचे नवे दालन खुले होणार आहे. तसेच जिल्ह्यात प्रशिक्षित परिचारिकांची उपलब्धता वाढून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मोठी मदत मिळणार आहे.

# नागभीड तालुक्यात धानचोरांची टोळी सक्रिय?

### मांगरूड मध्ये २१ पोती धान्यासह ट्रॅक्टरची बॅटरी लंपास; शेतकऱ्यांचे ३५ हजार ५०० रुपयांचे नुकसान

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०९, चिमूर (चंद्रपूर) :** नागभीड तालुक्यात शेतातून धानाच्या पोत्यांच्या चोरीच्या घटना वाढू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चिंधीचक येथील घटनेनंतर आता मांगरूड गावातही शेतासमोर ठेवलेल्या २१ धानाच्या पोत्यांसह ट्रॅक्टरची बॅटरी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून, या परिसरात धानचोरांची टोळी सक्रिय असल्याची चर्चा रंगू लागली आहे.नागभीड तालुक्यातील मांगरूड येथील शेतकरी यादव देवराव किन्नाके (वय ४५) यांनी नागभीड पोलिस ठाण्यात दिलेल्या तोंडी तक्रारीनुसार, त्यांच्या मालकीच्या शेतातील धान काढून १६ जून रोजी शेतासमोरील मंगरुळ-गोविंदपूर मार्गावर वाळवून ४० पोत्यांमध्ये भरून ताडपत्रीने झाकून ठेवण्यात आले होते.

१८ जून रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता त्यांनी पोत्यांची पाहणी केली असता सर्व ४० पोती जागेवर होती. मात्र १९ जून रोजी सकाळी पुन्हा पाहणीसाठी गेल्यानंतर पोत्यांची संख्या कमी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. मोजणी केली असता ४० पैकी २१ पोती गायब असल्याचे स्पष्ट झाले. आजूबाजूला शोध घेऊन तसेच परिसरातील नागरिकांकडे चौकशी करूनही धानाचा मागमूस लागला नाही.चोरट्यांनी प्रत्येकी सुमारे १,५०० रुपये किमतीची २१ धानाची पोती, असा एकूण ३१ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याच ठिकाणी उभी असलेल्या मारोती रामदास उईके यांच्या ट्रॅक्टर (क्र. एमएच ३४ एल ९८०५) मधील सुमारे ४ हजार रुपये किमतीची जुनी बॅटरीही चोरीला गेली. त्यामुळे एकूण ३५ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान, याच परिसरातील चिंधीचक गावात ही यापूर्वी शेतात ठेवलेले धान्याचे पोते चोरीला गेल्याची घटना घडली होती. याच मार्गावरील शाळेच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये ट्रॅक्टर द्वारे उद्या चोरून नेत असल्याचे आढळून आले होते मात्र अद्यापही त्या चोरट्यांच्या शोध लागलेला नाही. आतामांगरूड मधील चोरीमुळे या भागात धानाचे पोते चोरणारी टोळी सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनांमुळे शेतकरी वर्गात मोठी चिंता निर्माण झाली असून, शेतात ठेवलेले धान सुरक्षित राहील का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागभीड पोलिसांना या चोरीची माहिती देण्यात आली असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे. परिसरात रात्रीची गस्त वाढवून अशा चोऱ्यांना आळा घालण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# चिचोली (खापरखेडा) - चनकापूर - भानेगाव संयुक्त नगरपरिषद कधी होणार?

### नगरविकास मंत्रालयाच्या 'मौन'मुळे राजकीय संभ्रम कायम

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील चिचोली (खापरखेडा)-भानेगाव आणि चनकापूर या तीन ग्रामपंचायतींचे विलीनीकरण करून चिचोली(खापरखेडा)- चनकापूर -भानेगाव संयुक्त नगरपरिषद स्थापन करण्याचा प्रस्ताव मागील अनेक महिन्यांपासून नगरविकास मंत्रालयात धूळ खात पडला आहे.

या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेले आदेशही डावलण्यात आले आहे. नगर विकास मंत्रालयाच्या या 'मौन' मूळे राजकीय संभ्रम निर्माण झाला असून चिचोली(खापरखेडा)-चनकापूर-भानेगाव संयुक्त नगरपरिषद कधी होणार याकडे चिचोली जि.प.सर्कल परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

संयुक्त नगरपरिषदेचा रीतसर प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत ५ मे २०२५ रोजी नगरविकास मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता. दरम्यान भाजप ओबीसी आघाडीचे जिल्हा महामंत्री विलास महल्ले यांनी २३ जून २०२५ रोजी नगरपरिषद निर्मिती व चनकापूर ग्रामपंचायतला स्वतंत्र दर्जा देण्याबाबत नगरविकास मंत्रालयाकडे अर्ज दाखल केला होता. मात्र, नगरविकास मंत्रालयाने यावर कोणतीही दखल घेतली नाही अखेर महल्ले यांनी १५ जुलै २०२५ रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने नगरविकास मंत्रालयाला अर्जावर ८ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे स्पष्ट आदेश दिले होते

उच्च न्यायालयाने दिलेल्या ८ महिन्याच्या मुदतीला ८ महिन्यांपेक्षा जास्त काळ झाला आहे यादरम्यान नगरविकास मंत्रालयाने निर्णय घेऊन संयुक्त नगरपरिषदेची अधिसूचना काढणे अपेक्षित होते मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशाला डावलण्यात आले आहे.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी खापरखेडा परिसराच्या विकासासाठी नगरपरिषद करण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. राज्यात भाजप मित्रपक्षाची





सरकार असताना नगरपरिषद प्रस्तावाला मंजुरी मिळत नसल्यामूळे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या आश्वासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चनकापूर ग्रामपंचायतला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाला आहे. याठिकाणी प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे. येणाऱ्या काही ग्रामपंचायत निवडणुका लागण्याची दाट शक्यता आहे. राजकीय जाणकारांच्या मते ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्या तर संयुक्त नगरपरिषदेचा प्रस्ताव रेंगाळण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारने चिचोली(खापरखेडा) - चनकापूर -भानेगाव संयुक्त नगरपरिषदेची अधिसूचना काढून हा प्रश्न कायमचा निकाली काढणे गरजेचे आहे.पावसाळी अधिवेशनात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार डॉ.आशिष देशमुख नगरपरिषद मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधून जनतेला न्याय मिळवून देतात की राजकीय संभ्रम असाच कायम राहतो. याकडे संपूर्ण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# रिपब्लिकन कामगार युनियनचा झंझावत सुरू ; जिल्हा कार्यकारणीच्या नियुक्त्या

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०९, शहापूर (ठाणे) :** रिपब्लिकन कामगार युनियनच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड मुरबाड शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झाली.

केंद्रीय मंत्री डॉ.रामदास आठवले यांचा आशीर्वाद सह, मुख्य मार्गदर्शक व मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आ. किसन कथोरे यांच्या सहकार्याने व मोलाच्या मार्गदर्शनाने तसेच रिपाईचे नेते सुरेश दादा बारसिंग यांचा प्रमुख सल्लागार मार्गदर्शनात व रिपब्लिकन कामगार युनियनचे संस्थापक अध्यक्ष व कामगार नेते रमेश भोईर यांच्या आदेशानेरिपब्लिकन कामगार युनियन ठाणे जिल्हा अध्यक्ष दिनेश उघडे यांच्या अध्यक्षतेखाली रिपब्लिकन कामगार युनियन ठाणे जिल्हा सरचिटणीस किशोर चन्ने, कार्याध्यक्ष कमलाकांत बनसोडे, उपाध्यक्ष राजेंद्र पाठक, भगवान भालेराव, संघटक : मिलिंद भोईर, प्रसिद्धी प्रमुख संजय बोरगे, रिपब्लिकन जनरल युनियन ठाणे जिल्हा यांना नियुक्तीपत्र



देऊन जिल्हातील जबाबदाऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

नियुक्ती वेळी महाराष्ट्र राज्य रिपाई उपाध्यक्ष महेबूब पैठणकर, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती अध्यक्ष अण्णा साळवे, भारतीय बौध्दमहासभा तालुका अध्यक्ष ऍड.शरद थोरात लोकक्रांती संघटनेचे अध्यक्ष नरेश मोरे, ठाणे जिल्हा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष शंकर करडे, सामाजिक कार्यकर्ते, राष्ट्रवादी मुरबाडचे नेते नामदेव गायकवाड, रिपाई सरचिटणीस भूपेश साटपे, वि.प.ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष उघडे, जेष्ट पत्रकार प्रकाश जाधव, रिपाईचे भगवान उबाळे, पत्रकार दिलीप पवार, रिपाईचे व पत्रकार सुभाष जाधव, पत्रकार चेतन पोतदार, रिपाईचे कांचन उघडे, युवा उद्योजक महेंद्र गायकवाड, सुधाकर शेळके, सह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार दत्ता माळवे यांनी केले.

दिनेश उघडे यांनी पत्रकार यांच्याशी बोलताना सांगितले. की, रिपब्लिकन कामगार युनियनच्या माध्यमातून ठाणे जिल्हा ग्रामीण, ठाणे शहर, मीरा भाईंदर शहर नवी मुंबई, उल्हासनगर शहर, क्ल्याण शहर आधी भागात युनियनच्या माध्यमातून कामगारांना न्याय देण्यासाठी सदैव तत्पर असेल व आज माझ्या सहकाऱ्यांची निवड अधिकृत झाली असून, संपूर्ण जिल्हाभर ही कार्यकारिणी काम करून सर्व निवडी २ महिन्यात पूर्ण करू व लवकरच कामगार मेळावा आदरणीय केंद्रीय मंत्री आठवले साहेब यांच्या उपस्थितीत कल्याण येथे घेऊ असे आश्वासन दिले. त्यांच्या सहकाऱ्यांच्या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून शुभेच्छाचे वर्षाव होत आहे.

# जावळीतील पूरग्रस्त भागाची माजी राज्यसभा खा.पाटील यांच्याकडून पाहणी

## निफाड रस्ता तातडीने मोटरेबल करणार; नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करण्याच्या सूचना

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०९, पेण (रायगड) :** पेण तालुक्यात ५ ते ७ जुलैदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे बालगंगा नदीने रौद्ररूप धारण करत वरसई विभागातील जावळी, निफाड आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर हानी केली आहे. महापुराच्या पाण्यामुळे रस्ते वाहून गेले, स्मशानभूमीचे नुकसान झाले, तर भाताच्या रोपवाटिका व शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी बुधवार (दि. ८) रोजी पूरग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.पाहणीदरम्यान त्यांनी जावळी-निफाड मार्गाची पाहणी केली. पुराच्या प्रचंड प्रवाहामुळे अनेक ठिकाणी रस्ता वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. निफाड गावाशी संपर्क तुटल्याने ग्रामस्थ, शाळकरी विद्यार्थी तसेच अत्यावश्यक सेवांवर परिणाम झाला आहे. जावळी येथील स्मशानभूमी ही पुराच्या पाण्यामुळे वाहून गेल्याने ग्रामस्थांसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

महापुरामुळे जावळी व निफाड परिसरातील भाताच्या रोपवाटिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरून हजारो रोपांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतांमध्ये गाळ साचल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासनाची मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी यावेळी केली.



यावेळी माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील म्हणाले, ५ ते ७ जुलैदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे जावळी व निफाड परिसराचे अतोनात नुकसान झाले आहे. ज्या ठिकाणी भाताच्या रोपांमध्ये पुराचे पाणी शिरून नुकसान झाले आहे, त्या ठिकाणी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने भेट देऊन पंचनामे करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल.ते पुढे म्हणाले, सध्या सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुराच्या पाण्यामुळे वाहून गेलेला जावळी-निफाड रस्ता आहे. या रस्त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून विद्यार्थी, रुग्ण आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित ठेकेदाराला तातडीने सूचना देण्यात आल्या असून पावसाचा जोर कमी होताच येत्या दोन ते तीन दिवसांत हा रस्ता मोटरेबल करून वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील.यावेळी माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्राइम ब्रँचचा छापा; विमाननगर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न




**वसुलीच्या चर्चेदरम्यान स्पा रॅकेटचा पर्दाफाश; प्रश्न अनुत्तरितच**

दरम्यान, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुणे शहर उपाध्यक्ष सचिन चव्हाण यांनी यापूर्वी विमाननगर परिसरातील कथित मटका व इतर अवैध व्यवसायांबाबत पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला होता. त्या अर्जात एका पोलीस कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्या अर्जावर कोणती कारवाई झाली याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

**– सचिन चव्हाण (उपाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, पुणे शहर)**

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पुणे :** विमाननगर परिसरातील 'सायलेंट स्पा'वर पुणे गुन्हे शाखेने टाकलेल्या छाप्यात कथित देहव्यापाराचा पर्दाफाश होऊन अल्पवयीन मुलीसह चार महिलांची सुटका करण्यात आली.

या कारवाईमुळे केवळ एक गुन्हा उघडकीस आला नाही, तर स्थानिक पोलीस यंत्रणेच्या कामकाजावरही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. विमाननगरसारख्या गजबजलेल्या आणि संवेदनशील परिसरात स्पा सेंटरच्या आड कथित अवैध प्रकार सुरू असताना स्थानिक पोलीस ठाण्याच्या गुप्त माहिती यंत्रणेला त्याची कल्पना नव्हती का, अशी चर्चा सुरू झाली आहे. अखेर कारवाईसाठी गुन्हे शाखेलाच पुढे यावे लागल्याने स्थानिक स्तरावरील तपास, देखरेख आणि माहिती संकलन किती प्रभावी आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

यापूर्वीही विमाननगर परिसरातील एका स्पावर पोलिसांनी कारवाई केली होती. त्या प्रकरणानंतर एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. अशा गंभीर घटनांनंतरही परिसरातील काही संशयित स्पा आणि इतर कथित अवैध व्यवसाय सुरू असल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे अशा प्रकारांना वेळेत आळा का बसत नाही, संबंधित यंत्रणांकडून सातत्याने प्रभावी कारवाई का होत नाही आणि अशा व्यवसायांवर कायमस्वरूपी नियंत्रणासाठी नेमकी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

पोलिस आयुक्त या प्रकरणाकडे केवळ एका स्पावरील कारवाई म्हणून न पाहता, विमाननगर परिसरातील अशा सर्व संशयित ठिकाणांची तपासणी करून अवैध व्यवसायांवर व्यापक मोहीम राबविण्याची गरज आहे. तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणेच्या कामकाजाचा ही वस्तुनिष्ठ आढावा घ्यावी.

# पावसाची दडी; दुबार पेरणीच्या संकटाने पालम तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पालम (परभणी) :** पावसाळा सुरू होऊन महिनाभराचा कालावधी उलटला असला तरी पालम तालुक्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पालम, पेठशिवणी, रावराजूर, चाटोरी आणि बनवस या पाचही महसूल मंडळांत अद्याप समाधानकारक पाऊस झाला नसल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे.

आकाशात दिवसभर ढगांची गर्दी होत असली तरी दिवसातून तीन-चार वेळा पडणारी केवळ रिमझिम किंवा भुरभुर शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे. हा पाऊस फक्त कपडे ओले करतो, पण शेताला जीवदान देत नाही, अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

जून महिन्याच्या अखेरीस झालेल्या किरकोळ पावसाच्या आधारावर तालुक्यातील सुमारे ८० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांची पेरणी पूर्ण केली. मात्र त्यानंतर पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्याने अनेक ठिकाणी बियाणे अंकुरले नाही, तर ज्या शेतात उगवण झाली तेथील कोवळी रोपे उन्हाच्या तडाख्याने करपू लागली असल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहे.दुबार पेरणी करावी लागल्यास पुन्हा मशागत, बियाणे, मजुरी, खते आणि औषधांवर मोठा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, हवामान खात्याने वर्तविलेला पावसाचा अंदाज प्रत्यक्षात उतरावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. पुढील काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत असून, कृषी विभागाने परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन व मदत करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख चिंता**

- दुबार पेरणीचे वाढते संकट
- उगवलेली पिके वाळण्यास सुरुवात
- महागड्या बियाणे व खतांवरील गुंतवणूक धोक्यात
- पीक कर्जाची परतफेड कशी करायची, याची चिंता
- दमदार पावसाकडे लागलेले शेतकऱ्यांचे डोळे

# OC-CC असलेल्या इमारतींनाही सुनावणी नोटिसा; जुईनगरच्या नागरिकांमध्ये संताप

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०९, जुईनगर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या बी विभाग (नेरूळ) कार्यालयाकडून जुलै २०२६ मध्ये दिनांक १२ जून २०२६ च्या सुनावणी नोटिसा जुईनगर सेक्टर-२३ येथील १२.५ टक्के योजनेतील अनेक इमारतींना बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संबंधित इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (OC) व पूर्णत्व प्रमाणपत्र (CC) उपलब्ध असूनही त्यांच्याकडून पुन्हा कागदपत्रांची मागणी करण्यात येत असल्याने नागरिकांना विनाकारण हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार आहे.गेली दोन दशके या इमारतींमध्ये वास्तव्यास असलेले रहिवासी संबंधित अधिकाऱ्यांकडे जाऊन, आमच्या इमारतीला अधिकृत OC व CC आहे. आम्ही २० वर्षांहून अधिक काळ येथे राहत आहोत. मग आम्हाला अनधिकृत इमारतीप्रमाणे नोटिसा का? असा सवाल उपस्थित करत आहेत. मात्र सर्वांनाच एकाच पद्धतीने कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढत आहे.

याबाबत जुईनगरचे समाजसेवक श्रीधर मढवी यांनी सांगितले की, जनहित याचिका क्र. १११/२०२२ मध्ये न्यायालयाने २७ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आदेशानंतर ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र न्यायालयाच्या आदेशाचा अर्थ सर्व अधिकृत इमारतींना सरसकट नोटिसा बजावणे असा होत नाही. प्रत्यक्ष पाहणी, उपलब्ध अभिलेखांची पडताळणी आणि वस्तुस्थिती तपासल्यानंतरच पुढील कारवाई होणे अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. श्रीधर मढवी यांनी प्रश्न उपस्थित केला की, संबंधित इमारतींच्या CC व OC संदर्भातील सर्व माहिती महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडे आधीपासून उपलब्ध असताना नागरिकांकडून पुन्हा तीच कागदपत्रे मागविण्याची गरज काय? त्यामुळे ही प्रक्रिया केवळ न्यायालयासमोर औपचारिकता पूर्ण केल्याचा आभास निर्माण करण्यापुरती तर नाही ना, अशी शंका नागरिक व्यक्त करत आहेत. अनधिकृत बांधकामांवर वेळेत कारवाई न होणे, त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होणे आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित न होणे, हीच अशा जनहित याचिकांची मूळ कारणे असल्याचा आरोपही मढवी यांनी केला. प्रत्येक विभाग अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांसाठी त्यांची जबाबदारी निश्चित करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली का, याची माहितीही सार्वजनिक करण्याची त्यांनी मागणी केली. अधिकृत परवानग्या असलेल्या इमारतींना पाठविलेल्या सुनावणी नोटिसा तातडीने मागे घेऊन, केवळ प्रत्यक्षात अनधिकृत असलेल्या बांधकामांचीच चौकशी करावी. अन्यथा नागरिकांना विनाकारण त्रास देण्याचा हा प्रकार थांबणार नाही, अशी भूमिका जुईनगरमधील रहिवासी आणि समाजसेवक श्रीधर मढवी यांनी मांडली आहे.ही आवृत्ती अधिक व्यावसायिक वृत्तपत्र शैलीतील आहे. यात आरोप आणि मते ही श्रीधर मढवी यांच्या भूमिकेच्या स्वरूपात स्पष्टपणे मांडली आहेत, त्यामुळे बातमी अधिक संतुलित आणि प्रकाशित करण्यायोग्य वाटते.

# थोडक्यात

## मुंबई महापौर चषक नेटबॉल स्पर्धा २०२६ साठी नोंदणीला सुरुवात

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०९, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई नेटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुंबई महापौर चषक नेटबॉल स्पर्धा २०२६ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील संघांची नोंदणी सुरू झाली आहे. ही स्पर्धा दि. २० जुलै २०२६ रोजी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स,अंधेरी (प.), मुंबई येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. मुंबईतील नेटबॉल खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी तसेच उच्च दर्जाच्या स्पर्धात्मक वातावरणात खेळण्याची ही सुवर्णसंधी आहे. या स्पर्धेत १६ वर्षांखालील मुलगे व १६ वर्षांखालील मुली या गटांमध्ये सामने खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट क्रीडा सुविधा, व्यावसायिक आयोजन,थेट समालोचन, छायाचित्रण व व्हिडिओग्राफी, थेट प्रक्षेपण (डळींश डींॲशराळपस), ट्रॉफी, पदके, प्रमाणपत्रे तसेच इतर आकर्षक सुविधा उपलब्ध असतील. मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये,क्रीडा संस्था व नेटबॉल संघांनी आपल्या संघांची नोंदणी लवकरात लवकर करून या मानाच्या स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

स्पर्धेचा तपशील
स्पर्धा :- मुंबई महापौर चषक नेटबॉल स्पर्धा २०२६
दिनांक :- २० जुलै २०२६
स्थळ :- अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स,अंधेरी (प.), मुंबई
वयोगट :- १६ वर्षांखालील मुलगे / मुली
नोंदणी :- सुरू
संपर्क :- ९८९२०९२९३९

## कोराडी प्रकल्पाकडून वृक्षारोपण; टप्प्याटप्प्याने वृक्षारोपण राबविणार - विलास मोटघरे



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** ३६६० कोराडी प्रकल्पाचे वृक्षप्रेमी मुख्य अभियंता विलास मोटघरे यांच्या हस्ते वीज केंद्र वसाहतीत वृक्षारोपण करण्यात आले. आंब्याचे झाड मोठे व दाट असल्याने सावली, ऑक्सिजन आणि वातावरण शुद्धीकरणासाठी उपयुक्त आहे. ते जमिनीची धूप ही रोखते. भविष्याच्या दृष्टीने लहान मुलांपासून तर वयोवृद्धांना आवड असणाऱ्या आंबा फळाची झाडे टप्प्याटप्प्याने लावण्यास सुरुवात केली आहे. कोराडी वसाहतीत पडीत जमिनीची मशागत करून त्या जागेवर आंबा वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या ठिकणी कुंपण करून मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात आली. मुख्य अभियंता विलास मोटघरे पर्यावरण संवर्धनाच्या कार्यक्रमाला बळकटी देण्यासाठी नेहमीच अग्रेसर राहतात. वीज केंद्राच्या आजूबाजूच्या परिसरातील पर्यावरणाचे संवर्धन कसे करता येईल, पर्यावरणाचा समतोल कसा राखता येईल, हे ध्येय ठेऊनच सातत्याने वृक्षारोपण कार्यक्रम राबवितात. संपूर्ण महानिर्मिती परिसर हिरवागार करण्याचा त्यांचा संकल्प आहे. वृक्षारोपणा प्रसंगी उपमुख्य अभियंता एम.एम. बेडेकर, अधीक्षक अभियंता व्ही.एम. ढगे, कार्यकारी अभियंता डी.एल. पवार, ए.एच.ब्राह्मण व इतर अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## रस्त्याकडेचे नाले बंद; पावसाचे पाणी शेतात शिरून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०९, उंब्रज (सातारा) :** उंब्रज ते चरेगावदरम्यान पाटण-पंढरपूर राज्य मार्गाच्या विस्तारीकरणाचे काम काही ठिकाणी पूर्ण झाले असून काही ठिकाणी अद्याप सुरू आहे. मात्र, ज्या भागात रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, त्या ठिकाणी पावसाळ्यापूर्वी रस्त्याच्या दुतर्फा असलेले नाले खुले करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा फटका परिसरातील शेतकऱ्यांना बसला आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील पाणी थेट शेतांमध्ये शिरून पिकांसह शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उंब्रज परिसरातील कळंत्रेवाडी मध्ये एका ठिकाणी पावसाचे पाणी घराजवळील शेतात शिरल्याने शेतकरी जगन्नाथ थोरात यांनी जनावरांसाठी साठवून ठेवलेल्या कडव्याच्या गंजीला पाणी लागले. तसेच शेणखताची साठवणूक केलेल्या उकिरड्यातही पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात शेणखत वाहून गेले. याशिवाय शेतकरी राजेंद्र थोरात यांच्या शेतातही पावसाचे पाणी साचल्याने अवघ्या दोन दिवसांपूर्वी पेरलेले सोयाबीन कुजून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून नुकसान भरपाईची मागणी ही होत आहे.रस्त्याकडील नाले वेळेत खुले केले असते तर पावसाचे पाणी शेतात शिरले नसते, अशी भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ नाले मोकळे करून पाण्याचा निचरा सुरळीत करावा आणि भविष्यात होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## ठाण्यात झाड कोसळून जखमी झालेल्या ६४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यु



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, ठाणे :** यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मुंबई सह ठाणे शहरात झाडे कोसळून झालेल्या विविध अपघातात आजवर १० जणांचे हकनाक बळी गेले आहेत. दोनच दिवसापूर्वी ठाणे शहरातील आर.टी.ओ ऑफिसजवळ झाड कोसळून झालेल्या दुर्घटनेत ६४ वर्षीय पांडुरंग भिकू भुवड यांचा अपघात झाला झाला होता. दि.०६ जुलै रोजी दुपारी १२ च्या सुमारास झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळं हे झाड भुवड यांच्या अंगावर कोसळले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी महावीर जैन रुग्णालयात दाखल देखील केले होते, पण उपचारादरम्यान आज त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान या दुर्दैवी घटनेबाबत तीव्र आक्षेप घेताना स्थानिक नगरसेविका मीनल संखे यांनी ठाणे महापौरांना पत्र लिहून पालिकेच्या ढिसाळ कारभारावर तीव्र आक्षेप घेतला आहे.